ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 2 | OCTOBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सम्राट अशोकाचे धार्मिक धोरण

प्रा.डॉ. रणदिवे शामराव नानासो
इतिहास विभाग, एस.बी.आर. कॉलेज, म्हसवड ,
संलग्न: शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## प्रस्तावना :—



इ.स.पूर्व सहावे शतक हे धार्मीक विचार मंथनाचा दृष्टीकोनातून भारतात नव्हे तर जगाच्या इतिहासातही महत्वाचे आहे. याच शतकाच्या उत्तरार्धात गंगेच्या मध्य मैदानी प्रदेशात अनेक धार्मीक पंथाचा उदय झाला. यात जवळ जवळ ६२ धर्मीक पंथाचे उल्लेख सापडतात. हे पंथ प्रादेशिक चालीरिती आणि भारताच्या ईशान्य भागात राहणाऱ्या विविध लोकामध्ये प्रचलित असलेली कर्मकांडे यावर आधारीत होते. यामध्ये जैन व बौद्ध धर्म सर्वात महत्वाचे होते. धर्म सुधारणा चळवळीतून शक्तीशाली धर्म म्हणून हे धर्म उदयाला आले.

## कलिंग युद्ध :—

कलिंग युद्ध ही जगाच्या इतिहासातील एक क्रांतीकारक घटना समजली जाते. या युद्धामुळेच अशोकाच्या विचारात आणि आचारात क्रांतीकारक बदल घडून आला. कलिंगयुद्धाचे वर्णन मेगास्थेनीसने इंडिका ग्रंथात केले आहे. कलिंगच्या विजयामुळे अशोकाला फार मोठा धक्का बसला. कलिंगच्या युद्धातील अकारण रक्तपात पाहून त्याला पश्चाताप वाटू लागला. दु:खाने मन खिन्न झाले. त्याने हातात पुन्हा शस्त्र न घेण्याची प्रतिज्ञा केली. तलवारीच्या जोरावर प्रदेश काबीज करण्यापेक्षा धर्माने माणसांची मने काबीज करणे श्रेयस्कर होय असे त्यांने ठरविले. धर्मविजय हा श्रेष्ठ विजय होय असे त्यांचे मत बनले बौद्ध धर्माच्या अहिंसा तत्वाचे त्याला आकर्षण वाटू लागल्यामुळे त्यांनी बौद्धधर्माचा स्वीकार केला आणि "धर्मप्रसार" हे त्यांचे जीवितकार्य बनले.

## अशोकाचा धर्म :—

कल्हणच्या राजतरंगिणी मध्ये अशोक हा शिवभक्त होता असा उल्लेख आढळतो, परंतु कलिंगच्या युद्धानंतर बौद्ध तत्वाचे आकर्षण त्याला वाटू लागले आणि उपगुप्त नावाच्या बौद्ध भिक्षूच्या मदतीने त्याने बौद्धधर्माचा स्वीकार केला असे मानले जाते.

## स्वतंत्र धर्मखात्याची निर्मिती :—

धर्म प्रसाराचे कार्य सुकर होण्यासाठी स्वतंत्र धर्म खात्याची स्थापना केली. आणि त्यावर धर्म महामात्र नावाचे अधिकारी नेमले. साम्राजात प्रसार करण्यासाठी ठिकठिकाणी धर्मायुक्त, रज्जुक, पुरुष व प्रादेशिक नावाचे अधिकारी नियुक्त केले. स्त्री वर्गात धर्म प्रसार करण्यासाठी स्त्री महामात्राची योजना केली. हे कार्य योग्य प्रकारे होते की नाही हे पाहण्यासाठी धर्म निरिक्षक नेमले. ते राजाला अहवाल सादर करीत. धर्म प्रसार करणे व प्रजेत धर्मभावनेची वृद्धी करणे ही धर्म खात्याची प्रमुख कामे होती.

### सारनाथ येथे भिक्खू संघाची स्थापना :–

सम्राट अशोकांनी धम्मयात्रा करताना तथागतांनी प्रवर्तन केले होते तेथे भिक्सूसंघाची स्थापना केली होती. या पवित्र प्रसंगाची स्मृती सतत जागृत रहावी म्हणून सम्राट अशोकांनी आपल्या राज्यभिषेकाच्या २४ व्या वर्षी स्थीवर उपगुप्तासोबत सारनाथला जावून त्या जागेवर अशोकस्तंभ उभारला. हा स्तंभ अशोक चक्रांकीत व चार सिंहमुर्ती असलेला सुंदर विशाल स्तंभ उभारला. हाच स्तंभ स्वतंत्र भारताच्या नाण्यावर पुढच्या बाजूस चित्रांकित केलेला आहे. त्याशिवाय भारतीय नाण्याची सत्यता मान्य होत नाही. हीच मुद्रा राजमुद्रा आहे. हेच भारताचे गौरवचिन्ह आहे. सारनाथचा स्तंभ सम्राट अशोकाने भारताला दिलेली महान देणगी आहे. अशी देणगी कोणत्याही अन्य भारतीय शासकाने दिली नाही.

### स्तूप निर्मिती :–

सम्राट अशोकाने सर्वप्रथम स्तूप बांधण्यास सुरुवात केली. अंत्यसंस्कार क्रियेनंतर संत, महंत व बोधिसत्वाच्या अस्थी सुरक्षित ठेवण्यासाठी स्मारके उभी करण्यास प्रारंभ झाला. त्यामुळे स्तुपाला एक धार्मिक पवित्रता प्राप्त झाली. सम्राट अशोकाने गौतम बुद्धाच्या अवशेषावर भारत व अफगाणिस्तानात ८४००० स्तूप बांधल्याचा उल्लेख अनुश्रुतित आढळतो. अशोकानंतर नऊशे वर्षांनी चिनी प्रवासी हुएनत्संग हा भारतात आला होता. अशोकाने बांधलेले शेकडो स्तूप चांगल्या अवस्थेत असलेले त्याने स्वतः पाहिलेले होते, परंतु आज केवळ सांची आणि भरतहून येथील दोन स्तुपाचेच अवशेष आपणास प्राप्त झालेले आहेत. मौर्य काळात बौद्ध अनुयायांनी मूर्तीपूजेऐवजी स्मारकपूजा स्विकारली होती. त्यांनी गौतम बुद्धांच्या जीवनात ज्या ज्या ठिकाणी महत्वाचे प्रसंग घडले त्या त्या ठिकाणी लहान–मोठी स्मारके उभारण्यात आली. गौतम बुद्धाचे जन्मठिकाण लंबिंनी, ज्ञान प्राप्त झालेली बुद्धगया, त्यांनी पहिले प्रवचन दिलेले ठिकाण मृगवन (सारनाथ), त्यांच्या महापरिवर्तनाचे ठिकाण कुशीनगर, याशिवाय श्रावस्ती, राजगृह व वैशाली या ठिकाणी गौतम बुद्धानी आपल्या अंगातील अलौकिक शक्तीचा प्रत्यय लोकांना आणून दिला. ही आठ स्थळे बौद्ध धर्मात 'अष्टमहास्थळे' म्हणून ओळखली जातात. या सर्व ठिकाणी सम्राट अशोकाने स्तूप उभारले.

### तिसरी धम्म परिषद :–

भिक्कु निग्रोधच्या आचारविचाराच्या परिणाम सम्राट अशोकावर एवढा झाला की, त्यांनी पाटलीपुत्र येथे इ.स.पुर्व २४३ मध्ये तिसरी धम्म परिषद भरवली. या परिषदेत बौद्ध धर्मामध्ये वाढलेले मतभेद दुर करण्यात आले. भिक्कु संघाचा आराम व पाखंडी लोकांच्या उत्पन्नात घट पडली व चैन आराम करण्यासाठी अनेक पाखंडी लोक भिक्कु बनले. सम्राट अशोकाने या ठिकाणी कठोर भुमिका घेऊन पाखंडी लोकांना सम्राज्यातुन हाकलून दिले ही परिषद स्वतः सम्राट अशोकाने भरविली होती. या परिषदेचे अध्यक्ष पद मोगली पुत्र (तिस्स) पंडिताकडे दिले होते. ही परिषद ९ महिने चालली. या परिषदेत धर्मासंबंधी सर्व विवादग्रस्त विषयांवर मुक्तपणे विचारविनिमय करण्यात आला. याच परिषदेत मोग्गलिपुत्त तिस्स यांनी रचलेला कथावस्तु हा ग्रंथ सर्वांनी प्रमाणरुप मानून स्विकृत केला. अशाप्रकारे अशोक बौद्ध धर्मातील वाईट गोष्टी व शिथिलता समाप्त करण्यात आणि धर्मास नवजीवन प्रदान करण्यास यशस्वी झाले. याच परिषदेत बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी विभिन्न राज्यांत धर्माप्रचारक पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.

### धर्ममहामात्रांची नियुक्ती :–

अशोकाने आपल्या राज्याभिषेकाच्या तेराव्या वर्षात धर्मप्रचार, धर्माचारण, धर्मव्यवस्था व लोककल्याणाच्या देखरेखीसाठी राज्यात 'धर्ममहामात्रा' नावाच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली. या पदाधिकाऱ्यांनी धर्मप्रसार व प्रचारासाठी अशोकास मदत केली. त्यामुळे धर्मानुशासन स्थापन झाले. हे धर्मानुशासन अशोकाच्या राज्यादर्शाचा आधार ठरले. आपला धम्म लोकांच्या माहितीसाठी प्रकाशित केला व राज्याधिकाऱ्यांना त्याचा प्रचार करण्याचा आदेश दिला. अशोकाने आपल्या पदाधिकाऱ्यांसाठी एक नियम केला, की त्यांनी प्रत्येक पाच वर्षांनी राज्याचा दौरा करुन आपल्या दैनंदिन कार्याशिवाय लोकांना धर्मानुशासनाचे ज्ञान दिले पाहिजे.

### धर्म प्रचाराक/प्रसार :–

सम्राट अशोकांनी बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी बौद्ध संघावरच विसबून न राहता आपली सत्ता संपत्ती व प्रतिष्ठा याचाही वापर यासाठी केला. सम्राट अशोकाच्या काळातच ब्रहत भारताचा पाया घातला. ज्याप्रमाणे गौतम बुद्धाने भिख्खुना चरथ भिख्खवे चारिकं बहुजन हिताय बहुजन सुखाय... असा उपदेश करुन संघातील भिख्खुन बौद्ध धर्म प्रसाराचा आदेश दिला. त्याचप्रमाणे सम्राट अशोकांनी बौद्ध प्रचारासाठी आदेश दिला. त्याचप्रमाणे सम्राट अशोकांनी बौद्ध प्रचारासाठी आपल्या अधिकाऱ्यांकडे जबाबदाऱ्या तर सोपविल्याच, शिवाय विविध भागात आणि देशात धर्म प्रसारक पाठविले. भारतातील म्हैसूर, मुंबई, महाराष्ट्र, कोकण, काश्मीर सह

भारताबाहेर ब्रम्हदेश, पेंगु, काबूल, गांधार, कंदहार, नेपाल, चीन, जपान, सिरीया, संघाय, बॅक्ट्रीया, अफगानिस्थान, श्रीलंका आदी ठिकाणी धर्म प्रसारकास पाठविलेले याची माहीती सिलोन मधील महावंस या ग्रंथातील १२ व्या अध्यायात मिळते.

## विदेशात धर्माचा प्रसार :—

अशोकाच्या दुसऱ्या, पाचव्या व तेराव्या शिलालेखावरुन समजते, की यवन राज्य, नाभक—नाभपती राज्य, भोज राज्य, आंध्र राज्य, गांधार राज्य, राष्ट्रीक प्रदेश व अपरांत प्रदेशात धर्मप्रचारक पाठविले होते. याशिवाय मौर्य साम्राज्याच्या बाहेर चोल, पांडय, सत्तियपुत्र, केरलपुत्र, ताम्रपणी व भारतवर्षाच्या बाहेर युनानी नरेश अंनियीक, तुरामाय मग व अलिकसुंदर साम्राज्यातही धर्मप्रचारकांनी विशेष कार्य केले. अशोकांनी दूर—दूर धर्मप्रचारक पाठविले. महारक्षित, मल्लांतिक, महाधर्मरक्षित, रक्षित, धर्मरक्षित, मज्झिम, महादेव, सोन, उत्तरा, महेंद्र व संघमित्रा यांना धर्म प्रचारासाठी अनुक्रमे यवनराज्य, काश्मीर व गांधार, महाराष्ट्र, बनवासी, अपरांत, हिमालय, मैसूर व महिषमंडल, सुवर्ण भूमी आणि श्रीलंका येथे पाठविण्यात आले. संघमित्रा व महेंद्र ही अशोकाची मुले होती. त्यांच्या प्रभावाने श्रीलंकेचा राजा तिष्य आणि त्याच्या प्रजेने बौद्ध धर्म स्वीकारला होता. ब्रम्हदेशातही अशोकाने धर्मप्रचारक पाठविले होते. दीपवंश व महावंश या बौद्ध ग्रंथावरुन समजते, की अशोक आणि त्याची अन्य मुलगी चारुमती हे धर्मप्रचारासाठी नेपाळला गेले होते. त्याठिकाणी त्यांनी 'ललितपट्टन' व 'देवपट्टन' नावाच्या दोन नगरांची स्थापना केली. तसेच त्यांनी 'ललितपट्टन' येथे एक चैत्य व काही स्तुपांची निर्मिती केली. अशाप्रकारे अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी धर्मप्रचारक व धर्ममहामात्रा यांना कामाला लावले. याशिवाय त्यांनी धर्माच्या प्रसारासाठी साम्राज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेलाही कामाला लावले व स्वत:ही धर्माचा प्रसार केला. त्यामुळे बौद्ध धर्म भारताबाहेर विदेशातही प्रसारित झाला. याचे सर्व श्रेय अशोकालाच द्यावे लागते.

## समारोप :—

सम्राट अशोकाने बौद्ध धर्म प्रसारात फार मोलाची भुमिका निभावली आहे. सम्राट अशोकाच्या बौद्ध धर्मातील प्रचार व प्रसारामुळे बौद्ध धर्म हा विश्व धर्म बनला. भारतात व भारताबाहेर या धर्माचा खुप मोठया प्रमाणात प्रसार आणि प्रचार झाला याचे सर्व श्रेय सम्राट अशोकास जाते. सम्राट अशोक हा बौद्ध धर्माचा महान प्रसारक असूनही आपल्या साम्राज्यात धर्मसहिष्णू धोरण अवलंबिनाश महान सम्राट होता. बाराव्या अभिलेखात अशोकाने इतर धर्माच्या बाबतीत धर्म सहिष्णूता पाळल्याचे वर्णन आहे. अशोकाची विश्वबंधुत्वाची कल्पना जगाला तारणारी ठरली आहे. आजच्या अणुबॉम्बच्या काळात त्यांची अहिंसा निती जगाला शांतता प्रदान करणारी आहे. सम्राट अशोकानीं आपल्या प्रजेच्या नैतिक विकासासाठी नियम सांगितले. दुसऱ्या व सातव्या स्तंभलेखात धर्म कसा असायला पाहिजे याचे वर्णन केलेले आहे. रोमीला थापर यांच्या मते, अशोकाचा धर्म हा पूर्णता अशोकाच्या मनातला आविष्कार होता. त्याची धर्मनिती ही साम्राज्यात एकी निर्माण करण्यासाठी अवलंबलेली योजना होती. सम्राट अशोकाच्या बौद्धधर्म प्रसारातील भूमिकाचा विचार केल्यास आपल्याला त्याची तुलना अलेक्झांडर किंवा ज्युलियस सिझर यांसारख्या महाबलाढय सम्राटांशीच करावी लागते. साम्राज्य संस्थापक आणि आक्रमक होण्याऐवजी त्याने भावी जीवनाच्या विकासाकरिता धर्मप्रसाराचे वैशिष्टय म्हणजे त्याने पत्कारले हे दिसून येते. अशोकाच्या धर्मप्रसाराचे कार्य पत्कारले हे दिसून येते. अशोकाच्या धार्मिक धोरणाचे वैशिष्टये म्हणजे त्याने लोकांच्या भावना दुखावल्या नाहीत तर प्रेमाने व स्नेहाने धर्म प्रसार केला.

## संदर्भ सुची :—

१. जोशी पी.जी., भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर, २००२ .
२. देशमुख मा.म., प्राचीन भारताचा इतिहास, विश्वभारती प्रकाशन, नागपुर २०१२.
३. कठारे अनिल, प्राचीन भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.२०१२.
४. थापर रोमिला , भारताचा इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली.१९९९.
५. जोशी .बी.आर व इतर, डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड—१, डायमंड पब्लिकेशन,पुणे,२००७.
६. कोसंबी डी.डी., प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड पब्लिकेशन, पुणे,२००६.
७. स्वामी शिला, प्राचीन भारताचा इतिहास, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, २००५.
८. देव प्रभाकर, प्राचीन भारत, विद्याप्रकाशन, नागपूर, १९९५.
९. कुलकर्णी अ.रा., प्राचीन भारत संस्कृती आणि इतिहास, देशमुख प्रकाशन, पुणे, १९६२.
१०. दिक्षीत ना.सी.,प्राचीन भारत, पिंपळापुरे आणि कंपनी पब्लिशर्स, नागपूर,१९९७